राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग वं विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी -२०१६/प्र.क्र. २२१ /शिक्षण-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३१ मार्च, २०१६.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम -२०१५/ प्र. क्र. २१९/तांशि-४, दिनांक ३१ मार्च, २०१६.

**प्रस्तावना :**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली असून त्यासंदर्भातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालीलप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१. प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे अंमलबजावणी करण्यात यावी.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीस दरवर्षी मंत्रिमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणून सदर योजनेस मान्यता देण्यात यावी.

३.सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुधारीत पद्धतीचा पुढील शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी विभागाने सविस्तर आढावा घ्यावा.

४. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेला निधी प्रत्येक वित्तीय वर्षी अर्थसंकल्पीत करुन उपलब्ध करण्यात यावा.

५. सदर योजनेचे मूळ निकष न बदलता अंमलबजावणीत सुधारणा करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस वित्त विभागाच्या सल्ल्याने प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालील सुधारित अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे-

अ) **आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)** :- असोशिएशन ऑफ मॅनेजमेंट्स ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास राबविलेल्या प्रवेश प्रक्रियेतून अथवा शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षाद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यन्तच्या कालावधीसाठी लागू राहील. मात्र सदर प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

**ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत-** राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतनांसमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविली जाणारी व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू राहिल.

या योजनेमध्ये खालील अभ्यासक्रमांचा समावेश राहील :-

| **पदविका** | **पदवी** | **पदव्युत्तर पदवी** |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए./एम.एम.एस. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एचएमसीटी | एचएमसीटी | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) **कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग :-** राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित विद्यालये/महाविद्यालयांमधील शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती पुढील अभ्यासक्रमांसाठी ही प्रतिपूर्ती योजना लागू राहील.

**कृषी विद्यालये (पदविका)**
**दुग्ध व्यवसाय विकास (पदविका)**
**कृषी व संलग्न विषयांची महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**
**कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**
**कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**